**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**

**प्रेस नोट दि.२७/०३/२०१९**

**दि.२६/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे २७०/१९,भादविक ४२०,४६५,४७१,३४ |
| **फिर्यादी** | अभिषेक हरीदास,वय-३६,रा.राहुलनगर,कोथरूड,पुणे |
| **आरोपी** | पॉवर सोल इन्स्टिटयुट, चाकरणकर कॉर्नर मानाजीनगर जाधवर कॉलेज जवळ,न-हे,पुणेचे पदाधिकारी (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/०३/२०१९ ते दि.२५/०३/२०१९ रोजीचे दरम्यान पॉवर सोल इन्स्टिटयुट चाकरणकर कॉर्नर मानाजीनगर जाधवर कॉलेज जवळ,न-हे,पुणे येथे |
| **तपशिल** | दि.१४/०३/२०१९ रोजी मराठी वर्तमानपत्रा मध्ये शिक्षण विषयक शिर्षकाखाली जाहीरातीत पॉवर सोल इन्स्टिटयुट चाकरणकर कॉर्नर मानाजीनगर जाधवर कॉलेज जवळ,न-हे,पुणे यांचे पदाधिकारी यांनी नोकरी करीता,शासकीय विद्यापीठातुन कोर्स उपलब्ध यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, भारती विद्यापीठ, पुणे विद्यापीठ, इयत्ता १० / १२ वी महाराष्ट्र बोर्ड अशी जाहिरात देवुन, सदर कोर्सची माहितीपुस्तिका घेण्याकरीता फिर्यादी यांचेकडुन ५०० रूपये घेवुन, फिर्यादी यांना पॉवर सोल इन्स्टिटयुट कॅम्पसचे बाहेर जावुन,महाराष्ट्रात पदव्या देता येत नसताना,त्यांनी जनार्दन रायनगर राजस्थान विद्यापीठाचे खोटे ॲडमिशन फॉर्म देवुन,तशी जाहिरात देवुन,फिर्यादी व नागरीकांची फसवुणक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. जे.एस.मोहिते ८८०५१०९२०० |

**दि.२७/०३/२०१९ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे २४४/१९,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | विनय सिंग,वय-१९,रा.११४,इंद्रायणीनगर,भोसरी,पुणे |
| **आरोपी** | कार मधील चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०३/२०१९ रोजी २३/५५ वा. आंबेडकर सेतुचे पुढे तारकेश्वर चौकात चिमा गार्डनचे कमानी जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची कार नं.एमएच/१२/केई/८८६६ हि साईडला घेवुन फोनवर बोलत थांबले असताना,चारचाकी वाहनातुन आलेल्या यातील नमुद चार अनोळखी इसमांनी फिर्यादी यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना कारमधुन जबरदस्तीने खाली उतरवुन,त्यांना चाकुचा धाक दाखवुन,फिर्यादी यांची नमुद कार ४ लाख रू किंची ही बळजबरीने चोरून नेली. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एम.पी.भांगे ८८०५३३३०३३ |

**२**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १३८/१९,भादविक ४५२,३९४,४२७,३२३,५०४,५०६ (२),३४,महाराष्ट्र पोलीस अधिनियम ३७(१)१३५, भारतीय हत्यार कायदा कलम ४(२५) |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-५५ वर्षे,रा.गोसावी वस्ती,कर्वेनगर,पुणे |
| **आरोपी** | चार अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०३/२०१९ रोजी २०/३० वा. वनदेवी मंदीर समोर पर्वती निवास शेजारी गोसावी वस्ती, कर्वेनगर,पुणे येथे |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांची दोन्ही मुले मुले १.समीर प्रभाकर वांजळे,वय-२८ वर्षे २.कुमार प्रभाकर वांजळे,वय-३४ वर्षे हे त्यांचे राहते घरी असताना,यातील नमुद इसम शब्बीर व सौरभ हे त्यांचे दोन इतर अनोळखी मित्रासह येवुन त्यांना राजु रसाळ कोठे राहतो? असे विचारले असता,समीर याने मला माहित नाही असे म्हणाल्याचे कारणावरून त्यांनी चिडुन शिवीगाळ करून,फरशीचा तुकडा समीरच्या उजव्या पायावर व कुमार याचे डाव्या बाजुच्या बरगडीवर मारून,त्यांचे हातात असलेल्या कोयता त्यांचे अंगावर उगारून,तुम्हाला बघुन घेतो,खल्लास करतो,तुम्हाला उचलतो अशी धमकी देवुन,फिर्यादी व त्यांचे दोन्ही मुलांना लाथा-बुक्यांनी मारहाण करून त्यांचे राहते घरात जबरदस्तीने घसुन,घरातील वस्तुंचे नुकसान केले. तसेच ॲल्युमिनीयम डब्यातील १६,३००/- रोख रक्कम जबरदस्तीने काढुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एल.एस.उकीरडे ९८२३३००१९४ |

**३**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे २६६/१९,भादविक ३५३,३२३,३३२,५०४ |
| **फिर्यादी** | हेमंत धायगुडे, पो.शि. भारती विद्यापीठ पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | निखील सुशिल भगत,वय-२१,रा.गोकुळनगर,कात्रज,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२७/०३/२०१९ रोजी रात्रौ ०१/१२ वा. चव्हाण डेव्हलपर्स समोर कात्रज-सातारा रोड,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बीट मार्शलचे कर्तव्य करीत असताना,पोलीस कंट्रोलकडुन अपघाताचा कॉल प्राप्त झाल्याने ते कॉल पॉईंटचे ठिकाणी पोहोचुन, जखमी मोटार सायकलस्वार यास १०८ नंबरवरून त्यांचेकडुन प्राप्त केलेल्या कार मधुन जखमी यास भारती हॉस्पीटल येथे रवाना करून,त्याचे मागोमाग निघाले असताना,फिर्यादी यांना यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना धक्का-बुक्की व अपशब्द वापरून,फिर्यादी यांना जखमी करून,ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. श्रीशैल चिवडशेट्टी ८७७९१९३३७१ |

**४**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे १४७/१९,भादविक ३५३,३३२,५०९,५०६,३४,शासकीय गुपीत अधि.१९२३ चे क.७ |
| **फिर्यादी** | अजमलखान पठाण, पो.उप.निरी. बंडगार्डन पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | तीन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२६/०३/२०१९ रोजी १९/०० वा. कौन्सिल हॉल पोलीस चौकी मधील पत्र्याचे शेड मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी नमुद इसम निरज जैन यास अर्ज चौकशीकामी कौन्सिल हॉल चौकी येथे बोलाविले असता,त्याचेबरोबर आलेल्या इतर दोन इसमांपैकी एकाने त्याचे मोबाईल मध्ये फिर्यादी यांचे कामकाजाचे शुटींग करीत असताना,फिर्यादी यांनी चौकीमध्ये शुटींग करण्यास मनाई केल्याचे कारणावरून,सदर इसमांनी फिर्यादी यांना धक्का-बुक्की व अपशब्द वापरून,फिर्यादी यांना जीवे मारण्याची धमकी दिली. तसेच तेथे हजर असलेल्या म.पो. उप.निरी. यांनाही अपशब्द वापरून,फिर्यादी हे करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) दिगंबर शिंदे ९८२३८७८८११ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**